# <u>परिशिष्ट "अ"</u>

उप आयुक्त (विशेष अभियांत्रिकी) यांच्या अधिपत्याखाली मुंबई शहरास पाणी पुरवठा करणारे जल अभियंता व प्रमुख अभियंता (पाणी पुरवठा प्रकल्प) हे विभाग कार्यरत आहेत. भविष्यकाळात मुंबईची वाढती लोकसंख्या व त्यानुसार असलेली पाण्याची अतिरिक्त मागणी ह्यांचा विचार करता, संपूर्ण मुंबई शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी पाणीपुरवठ्याचे नवीन स्त्रोत विकसित करण्यात येत आहेत. त्यासाठी जल प्रक्रिया केंद्राची निर्मिती करणे व त्यायोगे नागरिकांना शुध्द पाण्याचा पुरवठा करण्याकरिता जल वितरण व्यवस्थेचे नियोजन करणे तसेच सध्या कार्यरत असलेल्या जल वितरण व्यवस्थेच्या परिरक्षण व प्रचालन या कामकाजावर देखरेख/नियंत्रण ठेवणे ह्या बाबी उप आयुक्त(विशेष अभियांत्रिकी) यांच्या अखत्यारित येतात.

जे.एन.एन.यु.आर.एम. व सध्याच्या अमृत योजने अंतर्गत प्राप्त होणारे विविध प्रस्ताव/कामे या बाबत बृहन्मुंबई महानगरपालिका व राज्य/केंद्र सरकार यामध्ये समन्वय साधण्यासाठी समन्वय अधिकारी म्हणून कामकाज पहाणे व त्या अनुषंगाने प्राप्त होणा-या प्रस्तावांवर/कामांवर देखरेख ठेवणे ही अतिरिक्त जबाबदारी उप आयुक्त (वि.अ.) यांच्याकडे सोपवण्यात आली आहे.